ISSN 2394-5303

GOLDEN JUBILEE YEAR

1967-2017

50

१९६६-२०१६

सुवर्ण महोत्सवी वर्ष

Printing Area

UGC

Jr.No.43053

UGC Approved Refereed Journal

Shri Balaji Sansthan, Deulgaon Raja's

## Shri Vyankatesh Arts, Commerce & Science College

Deulgaon Raja, Dist. Buldana (M.S.), PIN- 443204.

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

International Multilingual Research Journal

# Printing Area

Special Issue | December 2017

# Agricultural Development in India

Chief Editor:

Mr. Dnya[illegible]shwar

IMPACT FACTOR 4.002 iijif

www.vidyawarta.com

Scanned with OKEN Scanner

27) मराठवाडयातील शेती आणि सिंचन सुविधा: एक दृष्टीक्षेप
डॉ. एस. एन. बाबर, औरंगाबाद. (महाराष्ट्रा) ||92

28) जास्त सर्वसमावेशक ग्रामीण विकास आणि नविन आर्थिक धोरण
प्रा. रविंद्र शेंडे, वरोरा, (महाराष्ट्रा) ||94

29) कृषी प्रगतीसाठी स्वामीनाथन आयोगाची गरज
प्रा. डॉ. मधुकर एस. ताकतोडे, मंगरूळपीर, (महाराष्ट्रा) ||97

30) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कारणे व उपाययोजना
प्रा. डॉ. विष्णु पा. कुटे, नेर परसोपंत, (महाराष्ट्रा) ||100

31) करार शेतीच्या माध्यमातून कृषी विकास
डॉ. पंकज मा तायडे, पिंजर, जि. अकोला, (महाराष्ट्रा) ||103

32) स्वामीनाथन आयोग आणि कृषी विकास
श्रीमती. डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर, कळंब, , (महाराष्ट्रा) ||107

33) भारतीय शेतीसमोरील आव्हाने
अनिल गंगाधर पितळे, अंजनगांव सुर्जी, (महाराष्ट्रा) ||109

34) महाराष्ट्रातील कापसाचे उत्पादन आणि उत्पादकता
प्रा.डॉ.शिवाजी पाते; परभणी, (महाराष्ट्रा) ||112

35) शेतीमालाच्या विपणनाच्या पध्दती व समस्या
डॉ. संजय आनंदा डापके, सिल्लोड,, (महाराष्ट्रा) ||115

36) भारतीय कृषी व कृषीकल्याणाची सद्यस्थिती : एक आढावा
प्रा. प्रणया महेंद्र पाटील, नंदनवन, (महाराष्ट्रा) ||119

37) शाश्वत कृषी विकास आणि काळाची गरज
डॉ. कु. सपना डी. गवई, बुलडाणा, (महाराष्ट्रा) ||122

38)शेती साधनाच्या उपलब्धतेतील नकारात्मकता
डॉ.शंकर मारोती सावंत, दारव्हा, (महाराष्ट्रा) ||126

39) भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या
श्री. विद्यासागर सरदारसिंग बैनाडे, गजराज नगर, सिडको, औरंगाबाद, (महाराष्ट्रा) ||129

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com



Scanned with OKEN Scanner

32

# स्वामीनाथन आयोग आणि कृषी विकास

**श्रीमती. डॉ. जाधव मिनाक्षी भास्कर,**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय
कळंब, ता. कळंब जि. उस्मानाबाद.

**********

प्रस्ताविक :

हरितक्रांतीचे जनक मा. डॉ. एम. एस यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन सरकारने १८ नोर्हेबर २००४ रोजी घ्राष्ट्रीय कृषक आयोगाची स्थापना केली. शेती व शेतक-यांच्या विविध प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी या आयोगाची रचना करण्यात आली या आयोगाने २००६ पर्यंत एकूण ६ अहवाल सादर केले. शेवटचा अहवाल ४ आक्टोबर २००६ रोजी सादर करीत स्वामिनाथन आयोगाने शेत-यांची दुरअवस्थेची कारणे व त्यावर उपाय सुचवले.

कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कारण प्राचीन काळापासून म्हणजेच मानवाने वस्ती करण्यास सुरवात केल्यापासुन शेती हे भारतीयांच्या उपजिवीकेचे प्रमुख साधन आहे. त्यामुळे भारतीय अर्थाव्यवस्था अद्यापही कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. म्हणजेच आजही ६०% ते ७० % लोकसंख्या कृषीक्षेत्रावर अवलंबून आहे. आणि कृषीक्षेत्राचा GPD मधील वाटा १६ ते १७ % च्या दरम्यान आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतातील शेतीची उत्पादकता कमी होती. स्वातंत्र्योत्तर काळात पंचवार्षीक योजनेमध्ये शेतीला अग्रक्रम दिला गेला आणि शेतीची उत्पादकता वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले. विस्तृत शेती बरोबरच सखोल शेती पध्दतीवर भर देण्यात आला. म्हणजेच १९५१ नंतर नियोजनाचा अंगीकार केला व कृषीक्षेत्रावर भर देण्यात आला. पारंपारिक शेतीपासून तो आधुनिक शेतीपर्यंत कृषीक्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. पारंपारिक शेतीची जागा आता आधुनिक शेतीने घेतली आहे. त्यासाठी कृषीक्षेत्रकडे आता उदरानिर्वाहाचे साधन म्हणून न पाहता आता उत्पन्नाचे साधन म्हणून पाहिले जात आहे. शेतीबरोबरच कृषीवर आधारित इतर उदयोगदेखील केले जात आहेत. यामध्ये पशुपालन, मत्स्य व्यवसाय बागायती शेती, फुलांची शेती इत्यादी आर्थिक फायद्याची शेती केली जात आहे.

प्रस्तुत संशोधनात अभ्यास करत असताना भारतिय शेती सुधारली आहे. म्हणजेच भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला आहे. परंतु शेतक-यांच्या मालाला हमीभाव मिळत नसल्यामुळे व कृषी क्षेत्र सर्वस्वी निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतकरी दरवर्षी कर्जाच्या विळख्यात अडकत आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या मोठया प्रमाणावर होत आहे. हे रोखण्यासाठी व कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास करण्यासाठी तसेच शेतक-यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी स्वामीनाथन आयोग लागू करावा म्हणजे शेतक-यांचा विकास होईल व कृषी क्षेत्राचा विकास होऊन सर्व देशाचा सर्वांगीण विकास होईल. म्हणजेच स्वामीनाथन आयोग कृषी क्षेत्राला कशा पद्धतीने हितावह आहे याचे स्पष्टीकरण केले आहे.

**संशोधन अभ्यासाची उदिष्टये :**

१. स्वामीनाथन आयोगाचा भारतिय कृषीक्षेत्रावर झालेले परिणाम अभ्यासणे.

२. स्वामिनाथन आयोगाचे शेतीसाठी व शेतक-यांसाठी असणारे फायदे अभ्यासणे.

३. शेती व शेतक-यांसाठी आवश्यक असणा-या बार्बीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन अभ्यासाकरिता व्दितीय साधन सामुग्रीचा आधार घेतला असून यामध्ये विविध संदर्भ ग्रथ, मासिके, राज्य व केंद्र सरकारकडून प्रकाशित झालेली माहिती इंटरनेट इत्यादी.

**संशोधन अभ्यासाच्या मर्यादा :**

सदरील संशोधनामध्ये केवळ स्वामिनाथन आयोगाचा अभ्यास केला गेला आहे. तसेच स्वामिनाथन आयोग म्हणजेच काय त्यांच्या शिफारशी शेती व शेतक-यांसाठी कशा फायदेशीर आहेत हे अभ्यासले जाणार आहे.

**स्वामिनाथन आयोग आणि कृषी विकास :**

हरितक्रांतीचे जनक मा. डॉ. एम.एस स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखाली तात्कालीन सरकारने १८ नोव्हेंबर २००४ रोजी राष्ट्रीय कृषक आयोगाची शिफारस केली. स्वामिनाथन आयोगाने कृषी आणि शेतक-याच्या विकासासाठी समग्र दृष्टीकोनातून अधिक मुलभूत विचार मांडले आहेत. शेतमालाचे केवल उत्पादन वाढविणे म्हणजे विकास नव्हे तर शेतीत राबणा-यांना व देशाला अन्नदात्याला त्यातून निव्वळ उत्पन्न काय मिळाले. या भाषेत विकास मोजला गेला पाहिजे अशी मुलभूत मांडणी आयोगाने केली आहे. शेतकरी धोरण ठरवत असताना शेतीत राबणा-यांचे निव्वळ उत्पन्न वाढविण्यासाठी प्रेरक ठरतील अशा प्रवृत्ती व कृतींना गती दिली पाहिजे. असेही या स्वामिनाथन आयोगाचे मत आहे. शेतक-यांना उत्पादन खर्चावर ५०% नफा धरुन हमीभाव देण्याची आयोगाची शिफारस याच दृष्टीकोणाचा भाग आहे. जमीनीचा तुकडा नावावर असणा-यांचा केवळ विचार करुन शेतीचा प्रश्न सुटणार नाही. शेतीवर उदरनिर्वाहासाठी अवलंबून असणा-या प्रत्येकाचा प्रश्न



Scanned with OKEN Scanner

त्यासाठी समजून घ्यावा लागेल. म्हणजेच शेतीवर उपाजितीका करणारे सर्वच स्त्रिया व पुरुष, भूमिहीन शेतमजून, भाडेपटट्याने जमीन कसणारे शेतकरी, छोटे, सीमांत, अर्ध सीमांत व मध्यम लागवडदार शेतकरी, मोठे जमीनधारक, मासेमारी, पशुपालन, कुक्कुटपालन करणारे रेशीम व कीटम उदयोग इत्यादीचा समावेश शेतकरी या व्याखेत करुन शेतक-यांचा विकास म्हणजेच सर्वाचाच विकास असा व्यापक दृष्टीकोन समोर ठेवूनच ख-या अर्थाने कृषी क्षेत्रात शाश्वत विकासाचे धोरण ठरविणे शक्य आहे असे स्वामीनाथन आयोगाचे मत आहे.

**स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी :**

(१) शेतक-यांचे खर्च वजा जाता शिल्लक राहिलेले उत्पन्न हे सरकारी कर्मचा-यांप्रमाणे असावे. (२) शेतीमालाचा हमीभाव उत्पादन खर्च वगळता ५०% असावा. (३) शेतमालाची आधारभूत किंमत लागू करण्याची पध्दत सुधारुन गहू आणि इतर खाद्याण वगळता इतर पिकांना आाधारभूत किंमत मिळण्याची व्यवस्था करावी. (४) बाजाराच्या चढउतारापासून शेतक-यांचे संरक्षण व्हावे म्हणून मूल्य स्थिरता निधी ची स्थापना करावी. (५) आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमतीच्या दुष्परिणमापासून शेतक-यांचे संरक्षण करण्यासाठी इतर देशामधून येणा-या शेतमालाला आयात कर लावावा. (६) दुष्काळ व इतर आपत्तीपासून बचावासाठी कृषी आपत्काल निधी ची स्थापना करावी. (७) कृती पतपुरवठा प्रणालीचा विस्तार करावृ (८) संपूर्ण देशातील सर्व पिकांना कमी हप्त्यावर विमा संरक्षण मिळेल अशा रीतीने पिक विमा योजनेचा विस्तार व ग्रामीण विमा विकासनिधी ची स्थापना करावी. (९) पिकांच्या नुकरसानीचे मुल्यमापन करत असताना ब्लॉकच्या ऐवजी गाव हा घटक वापरुन विमा संरक्षण द्यावे. (१०) सामाजिक सुरक्षेचे जाळे निर्माण करुन त्या अंतर्गत शेतक-यासाठी वृध्दावस्थेत आधार तसेच स्वास्थ विम्याची तरतूद करावी. (११) परवडणा-या दरात बी-बीयाणे व इतर यंत्रसामुग्री उपलब्ध करुण द्यावी. (१२) संपूर्ण देशात प्रगत शेती व माती परिक्षण प्रयोगशाळेचे संचालन करणे. (१३) शेतीला कायम आणि समप्रमाणात सिंचन आणि वीजपुरवठा व्यवस्थेत आमुलाग्र सुधारणा घडवून आणाव्यात.

**जमीनधारण सुधारणा :**

शेती आणि जनावरांसाठी जमीन हा महत्वाचा प्रश्न आहे. एकूण २७ % जमीन ही १५ एकर किंवा अधिक जमीन असणा-यांकडे आहे. ३८% जमीन ही ५ ते १५ एक्कर जमीन असणा-यांकडे आहे. १९% जमीन ही २.५० ते ५ एक्कर जमीन असणा-यांकडे आहे. १३ % जमीन ही १ ते २.५० एक्कर जमीन असणा-याकडे आहे. यामध्ये जमीन सुधारणेची गरज आहे. जी अतिरीक्त तसेच उपजीवी नसलेली जमीन सरकारकडे आहे तिचे वाटप व्हावे.

**भारतीय कृषीची उत्पादन क्षमता :**

सिंचन पाण्याचा निचरा, जमीनीचा पीक आणि गुणवत्ता सुधारणे भजलपातळी वाढविणे, शेतमालाच्या वाहतुकीसाठी ग्रामीण रस्ते, शेतीशी निगडित पायाभूत सुविधांमध्ये जास्तीत जास्त गुतवणूक व्हावी. उत्पादन झालेल्या शेतमालाला विक्रीयोग्य झाल्यावर कमीत-कमी वेळेत बाजारपेठे मिळून चांगला भाव मिळावा. पाण्याच्या सोयींसोबतच जमीनीचा पोत सुधारायला माती परिक्षण प्रयोगशाळा आणि सत्ता केंद्र उपलब्ध व्हावित. जेणेकरुन कृषी विद्यापीठात झालेले संशोधन प्रत्यक्ष वापरात येऊन त्यात काय सुधारणा त्रुटी आहेत हेही आकलन होईल. सतत एकाच प्रकारची पिके घेतली तर मातीची गुणवत्ता कमी होते. त्यासाठी आलटून- पलटून पीक घेण्यासाठी मार्गदर्शन आणि मदत गरजेची आहे.

**कृषी क्षेत्रासाठी वित्तपुरवठा व विमा कवच :**

सरकारच्या मदतीने ४% सरळव्याजाने पतपुरवठा पीककर्जासाठी असावा आणि हा पतपुरवठा खरोखर गरीब आणि गरजांना मिळावा. गरीब शेतकरी शेतमजून- अल्पभूधारक शेतकरी यांचे जीवनमान उंचावण्यासाठी पतपुरवठा पायाभूत सुविधा, मनुष्यबळ विकास, शेती व शेतीपूरक व्यवसायाची उत्पादकता वाढविणे, बाजारपेठ सक्षम करणे इत्यादी उपाया करावेत.

अशा प्रकारे शेती आणि शेतकरी या दोघांच्या शाश्वत विकासासाठी काय उपाययोजना कराव्यात हे सुचवायला प्रोफेसर एम.एस स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली १८ नोव्हेंबर २००४ रोजी हा आयोग स्थापन झाला. या आयोगाची उददीष्टे म्हणजे अन्नसुरक्षा आणि पोषण यासाठी नियोजन. उत्पादन नफयाचे प्रमाण टिकूण राहणे या निकषांवर शेतीची होणारा पतपुरवठा वाढविले शेतजमीन सुधारणा सिंचन व्यवस्था म्हणजे कायमस्वरुपी शेतीसाठी पाण्याची व्यवस्था करणे. इत्यादी उद्दीष्टये ठरवून स्वामीनाथन आयोगाने शेती व शेतक-यांच्या फायदयाच्या शिफारशी सांगितल्या आहेत. त्या शिफारशी जर सरकारने किंवा आमंलात आणल्या तर भारतीय शेतमालाची विक्री वाढून शेतक-यांची आर्थिक बाजू सुधारण्यास मदत होऊ शकते. शेतकरी हा देशाचाच नाही तर जगाचा पोशिंदा आहे. त्यामुळे शेतकरी जगला तरच देशच काय पण विश्वही जगू शकेल यात शंका नाही.

**संदर्भग्रंथ :-**


१ किरण देसले - अर्थाशास्त्र भाग १ दिव्यस्तंभ प्रकाशन, जळगाव.

२ रंजन कोळंबे - भारतीय अर्थव्यवस्था भगीरथ प्रकाशन, पुणे.

३ एस. आर टकले, आणि टि. व्ही. पोवळे - कृषी अर्थशास्त्र सीरीन प्रकाशन (नवी दिल्ली)

४ www.chec.gov.in.




Scanned with OKEN Scanner